# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

Estd-1962
NAAC 'A++'Grade

## ५८ वा वार्षिक दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यांसाठी निवेदन

- विद्यापीठाच्या ५८ व्या दीक्षांत समारंभासाठी ऑक्टोबर २०२० व मार्च २०२१ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांनी पदवी/पदविका, प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन अर्ज खाली दर्शविलेल्या मुदतीमध्ये पदवी प्रमाणपत्र मागणीकरिता दीक्षांत अर्ज करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| १) दि. २९ नोव्हेंबर २०२१ ते दि. १८ डिसेंबर २०२१ पर्यत शुल्क | रु. २५०/- |
| २) दि. १९ डिसेंबर २०२१ ते दि. २३ डिसेंबर २०२१ पर्यत शुल्क | रु. ३५०/- |
| ३) दि. २४ डिसेंबर २०२१ ते दि. २८ डिसेंबर २०२१ पर्यत शुल्क | रु ८५०/- |
| ४) पीएच.डी प्राप्त विद्यार्थ्याचे दीक्षांत अर्ज दि. ०५ जानेवारी २०२२ पर्यत रु ८५०/- शुल्काने स्वीकारले जातील. | |

- नियमित विद्यार्थ्यांनी (PRN असणारे विद्यार्थी) संगणक प्रणालीमधील रेग्युलर (Regular) ऑप्शनमधूनच ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- स्वायत्त (Autonomus) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ऑटोनोमस (Autonomus) ऑप्शनमधूनच ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- नियमित व स्वायत्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. सदर विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- सर्व बी.कॉम. बी.एड. व विधीशाखा (लॉ) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी (PRN असणारे विद्यार्थी) संगणक प्रणाली मधून अर्ज भरताना आपला मुख्य विषय (Specialization) काळजीपूर्वक बिनचूक भरावा, यात चूक झाल्यास त्याची जबाबदारी संबंधितांची राहील.
- तसेच Regular ऑप्शन व Autonomus ऑप्शनमधून ऑनलाईन अर्ज करताना आलेली माहिती बरोबर आहे की नाही याची खात्री करावी. जर काही दुरुस्ती असेल तर प्रथम संबंधित विभागातून/संबंधित महाविद्यालयातून ती दुरुस्ती, माहिती अपडेट करुनच पदवी प्रमाणपत्राकरीता संबंधित ऑप्शनमधूनच अर्ज भरावा. सन २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी Manual ऑप्शन मधून अर्ज करावेत. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंट विदयापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही.
- सन २००२ पूर्वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच एम.फिल/पीएच.डी विदयार्थी, व श्रेणीसुधार (Improvement) विद्यार्थी यांनी ऑनलाईन अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे सुस्पष्ट अपलोड करावीत. अपु-या अर्जाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जाणार नाही व त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. दीक्षांत समारंभ आयोजनाचा दिनांक यथावकाश कळविणेत येईल.
- पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज www.unishivaji.ac.in/Web Apps (Regular Convocation) या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरावा लागेल. ऑनलाईन अर्ज भरताना प्रथम संकेतस्थळा वरील सूचना वाचाव्यात व आवश्यक ती माहिती सोबत ठेवावी. विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवी प्रमाणपत्र घेतले असेल तर परत नियमित साठी अर्ज भरु नये. त्याऐवजी दुबार पदवी प्रमाणपत्रासाठी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनाप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.
- अर्ज ऑनलाईन भरताना जे विद्यार्थी २००६ पूर्वी उत्तीर्ण आहेत अथवा ज्या विद्यार्थ्याचे फोटो ऑनलाईन दिसत नाहीत त्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG image (20 kb) अपलोड करुन अर्ज ऑनलाईन भरावा.
- जे विद्यार्थी २००२ पूर्वी उत्तीर्ण आहेत व जे विदयार्थी Manual ऑप्शन मधून अर्ज करणार आहेत त्या विद्यार्थ्यांनी स्वत:च्या फोटोची JPEG image (20 kb) अपलोड करुन अर्ज ऑनलाईन भरावा
- अर्ज भरताना विद्यार्थ्याचा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. दीक्षांत समारंभाची तपशिलवार माहिती विद्यार्थ्यांना SMS व्दारे कळविण्यात येईल. एकदा पेमेंट झालेबाबतचा संदेश आलेनंतर पुन्हा किमान ६० मिनिटे पुनश्च पेमेंट करु नये.
- वैद्यकीय शाखेच्या (Medical Faculty) विद्यार्थ्यांनी अर्जासोबत इंटर्नशीप पूर्ण केल्याच्या सर्टिफिकेटची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.
- ज्या परीक्षांचा निकाल Viva-Voce Exam नंतर जाहीर करण्यात येतो त्या परीक्षेच्या दीक्षांत अर्जासोबत Declaration of Result letter/Award letter ची प्रमाणित प्रत सुस्पष्ट अपलोड करणे आवश्यक आहे. (उदा. Ph.D/M.Phil etc.)
- श्रेणीसुधार परीक्षेस बसून ज्यांच्या निकालात श्रेणीसुधार झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मागणी करताना दीक्षांत अर्जासोबत पूर्वीचे मूळ पदवी प्रमाणपत्र विद्यापीठास परत करणे आवश्यक आहे. श्रेणी सुधारणा झाली नसलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करु नये.
- अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी आपला पूर्ण पत्ता, पिनकोड सहीत बिनचूक लिहावा/ऑनलाईन भरावा. चुकीचा पत्ता दिल्यास पत्रव्यवहार/पदवी प्रमाणपत्र पोहचू शकले नाही तर विद्यापीठ प्रशासन जबाबदार राहणार नाही.
- दूरशिक्षणव्दारे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना, जी महाविद्यालये बंद आहेत अशा विद्यार्थ्यांना तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील (उदा. सोलापूर जिल्हा) विद्यार्थ्यांना रजिस्टर पोस्टाने पदवी प्रमाणपत्र पाठविण्यात येईल.
- दीक्षांत समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्र प्राप्त होणा-या विद्यार्थ्याची यादी व इतर अनुषंगिक सूचना विद्यापीठाच्या वेबसाईटवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.
- काही तक्रार किंवा दुरुस्ती असल्यास, विदयार्थ्याने त्याच्या Log in मधील Grievence मध्ये नोंदवावी. अपु-या अर्जाची दखल घेतली जाणार नाही आणि त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.
- ऑनलाईन अर्ज करताना काही अडचणी उदभवल्यास खालील भ्रमणध्वनी वर संपर्क साधावा
  १) ऑनलाईन अर्जाबाबतीत तांत्रिक अडचणीबाबत संपर्क क्रमांक -आय.टी.सेल ०२३१/२६०९३३५
  २) ऑनलाईन शुल्काबाबत उद्भवणा-या अडचणीबाबत संपर्क क्रमांक -लेखा विभाग ०२३१/२६०९०७८
  ३) दीक्षांत विभाग - ०२३१/२६०९११३, ०२३१/२६०९३०२.

**श्री जी.आर.पळसे**
**प्र.संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**दीक्षांत विभाग**
**दि .: २८ नोव्हेंबर २०२१**